कविता

सरिता सदाशिव पवार
सत्य प्रयागबाई कुटे
छाया कोरेगावकर

## सखे.. तू सोबत राहा

सखे
तू असतेस म्हणे
सकळ मानवजातीच्या उत्पत्तीचा मार्ग.
स्त्री शरीराला मिळालेलं सृजनभान असतेस तू.
तू असतेस आनंदसोहळा
स्त्री-देहाच्या निर्मितीक्षमतेचा.
माहीत असेलच तुला
मातृमहतीने भरलीत
इथल्या संस्कृतीच्या इतिहासाची असंख्य पाने
ज्यांनी खरं तर करायला हवा होता गौरव
तुझ्या रूपात स्त्रीला लाभलेल्या
या सृजनोत्सुक देहधर्माचा.
अभिमानाचा बहर फुलारून यायला हवा होता
जेव्हा तू पाझरत असतेस स्त्री-देहातून
निरोगी स्त्रीत्वाची सशक्त खूण होऊन.

पण सखे
रुढींची झापडं बांधलेला समाज
तुझ्यामुळे
स्त्रीचं माणूसपणच नाकारतो गं..
झिडकारून, तोडून टाकतो तिला उर्वरित जगापासून
गुंडाळून ठेवतो विटाळाच्या अन्यायी, अमानवीय वेष्टनात.
या आत्मभानाच्या क्षणी
लेकीबाळींच्या चारही बाजूला उभ्या केल्या जातात
अस्वस्थ न्यूनगंडाच्या असुरक्षित भिंती.
पण सखे..
तरीही तू सोबत रहा.
तू मनात रुजवलेला स्वत्वाचा इवलासा अंकुर
प्रगल्भ जाणिवांनी जोपासू लागलोय आम्ही.
अलीकडे मुळापासूनच पुसून टाकतोय आम्ही मनावर असलेल्या
अदृश्य घुसमटीचे सावट..
देवधर्म – कर्मकांडांच्या गुंत्यातून
सोडवू पाहतोय तुला..
मोकळा करतोय श्वास तुझा आणि आमचाही..
पिढ्यांपिढ्यांचं विटाळाचं गाठोडं
भिरकावून देतोय आम्ही आमच्या जगण्यापल्याड...
सखे..
तू फक्त सोबत राहा...

**सरिता सदाशिव पवार**
मु. पो. वरवडे फणसवाडी
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग
ईमेल – rujuta664@gmail.com